भारत सरकार

**विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# भारतीय पुनर्वसन परिषद अधिनियम, १९९२

**(१९९२ चा अधिनियम क्रमांक ३४)**

[ ६ नोव्हेंबर २००३ रोजी यथाविद्यमान ]

# Rehabilitation Council of India Act, 1992

**(Act No. 34 of 1992)**

[ *As in force on the 6th November 2003* ]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

२००४

**[किंमत : रुपये ६-०० ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ६ नोव्हेंबर, २००३ रोजी यथाविद्यमान असलेला दि रिहॅबिलिटेशन कौन्सिल ऑफ इंडिया ॲक्ट १९९२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १३, अंक १, दिनांक २६ ऑगस्ट, २००४ यात पृष्ठ ३ ते १४ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ६ नोव्हेंबर, २००३.

डी. के. विश्वनाथन,
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edtion of the Rehabilitation Council of India Act, 1992 as on the 6th November 2003 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part-XII, Section-1, No. 1, Volume 13 dated 26th August 2004 on pages 3 to 14.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

D. K. VISHWANATHAN,
Secretary to the Government of India.

New Delhi,
Dated 6th November, 2003.

# भारतीय पुनर्वसन परिषद अधिनियम, १९९२

## कलमांचा क्रम


कलमे

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

२. व्याख्या.

### प्रकरण दोन

### भारतीय पुनर्वसन परिषद

३. भारतीय पुनर्वसन परिषदेची घटना आणि विधिसंस्थापन.

४. अध्यक्ष व सदस्य यांच्या पदाच्या अटी.

५. अनर्हता.

६. सदस्यांनी पद रिक्त करणे.

७. कार्यकारी समिती व इतर समित्या.

८. परिषदेचे सदस्य-सचिव आणि कर्मचारी.

९. परिषदेतील रिक्त पदांमुळे कृती आदि विधिअग्राह्य न ठरणे.

१०. पुनर्वसन परिषदेचे विघटन करणे आणि पुनर्वसन परिषदेच्या अधिकारांचे, दायित्वांचे व कर्तव्यांचे परिषदेकडे हस्तांतरण करणे.

### प्रकरण तीन

### परिषदेची कार्ये

११. भारतातील विद्यापीठ, इत्यादींकडून पुनर्वसन व्यावसायिकांना दिलेल्या अर्हतांना मान्यता.

१२. भारताबाहेरील संस्थांकडून देण्यात येणाऱ्या अर्हतांना मान्यता.

१३. अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेल्या अर्हता धारण केलेल्या व्यक्तींच्या नावाची नोंदणी होण्याचा हक्क.

१४. अभ्यास पाठ्यक्रमांची व परीक्षा यांची माहिती मागवण्याचा अधिकार.

१५. परीक्षांचे निरीक्षक.

१६. परीक्षेचे वीक्षक.

१७. मान्यता काढून घेणे.

१८. शिक्षणाचा किमान दर्जा.

१९. नोंदवहीत नोंदणी करणे.

२०. ज्यांची नोंदवहीत नोंदणी झाली आहे अशा व्यक्तींचे विशेषाधिकार.

२१. व्यावसायिक आचरण आणि नोंदवहीतून नावे काढून टाकणे.

२२. नोंदवहीतून नाव काढून टाकण्याच्या आदेशाविरुद्ध अपील.

२३. नोंदवही.

२४. परिषदेद्वारे दिली जाणारी माहिती आणि तिचे प्रकाशन.

२५. अपराधांची दखल.

२६. सद्भावपूर्वक केलेल्या गेलेल्या कारवाईस संरक्षण.

२७. परिषदेचे कर्मचारी लोकसेवक असणे.

२८. नियम करण्याचा अधिकार.

२९. विनियम करण्याचा अधिकार.

३०. नियम आणि विनियम संसदेसमोर मांडणे.

अनुसूची

# भारतीय पुनर्वसन परिषद अधिनियम, १९९२

(१९९२ चा अधिनियम क्रमांक ३४)

(६ नोव्हेंबर, २००३ रोजी यथाविद्यमान)

[१ सप्टेंबर, १९९२]

**[1][पुनर्वसन व्यावसायिकांच्या व कर्मचारीवर्गाच्या प्रशिक्षणाचे विनियमन आणि संनियंत्रण करण्यासाठी, पुनर्वसन आणि विशेष शिक्षण यांमधील संशोधनाच्या प्रचालनासाठी] भारतीय पुनर्वसन परिषद घटित करणे आणि केंद्रीय पुनर्वसन नोंदवही ठेवणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा अनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

हा अधिनियम भारतीय गणराज्याच्या त्रेचाळिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो:—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

**संक्षिप्त नाम व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, भारतीय पुनर्वसन परिषद अधिनियम, १९९२ असे म्हणावे.

(२) केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास* हा अधिनियम अंमलात येईल.

**व्याख्या.**

२. (१) या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "अध्यक्ष" याचा अर्थ, कलम ३ च्या पोटकलम (३) अन्वये नियुक्त केलेला परिषदेचा अध्यक्ष, असा आहे ;

(ख) "परिषद" याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित केलेली भारतीय पुनर्वसन परिषद, असा आहे ;

[1][(ग) "अधू" याचा अर्थ, विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ (१९९६ चा १) याच्या कलम (२) खंड (एक) मध्ये निर्देशित केलेली कोणत्याही विकलांगतेने पीडित असलेली व्यक्ती, असा आहे ;]

[3][* * * * * * ]

(च) "सदस्य" याचा अर्थ, कलम ३ च्या पोटकलम (३) अन्वये नियुक्त केलेला सदस्य, असा आहे आणि त्यात अध्यक्षाचा समावेश आहे;

(छ) "सदस्य-सचिव" याचा अर्थ, कलम ८ च्या पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेला सदस्य-सचिव, असा आहे ;

(ज) "मानसिकदृष्टया मतिमंदता" याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीच्या मनाचा अपूर्ण विकास किंवा खुंटलेली वाढ असा असून तिचे विशेष लक्षण म्हणजे बुद्धिमत्तेची अवसामान्यता हे होय ;

(झ) "अधिसूचना" याचा अर्थ, शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झालेली अधिसूचना, असा आहे ;

(ञ) "विहित" याचा अर्थ, विनियमांद्वारे विहित, असा आहे ;

(ट) "मान्यताप्राप्त पुनर्वसन अर्हता" याचा अर्थ, अनुसूचीमध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही अर्हता, असा आहे;

(ठ) "नोंदवही" याचा अर्थ, कलम २३ च्या पोटकलम (१) अन्वये ठेवलेली केंद्रीय पुनर्वसन नोंदवही, असा आहे;

(ड) "विनियम" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेला विनियम, असा आहे ;

---

*३१ जुलै १९९३—पहा स्थायी आदेश २८८(ङ) दिनांक २८ एप्रिल, १९९३.

१. २००० चा अधिनियम ३८, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (४ सप्टेंबर, २००० रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ (१) (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (४ सप्टेंबर, २००० रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ३ (१) (दोन) द्वारे खंड (घ) व (ङ) गाळण्यात आले (४ सप्टेंबर, २००० रोजी व तेव्हापासून).

[1][(डक) "पुनर्वसन" या शब्दाचा निर्देश, विकलांग व्यक्तींना शारीरिक, संवेदनात्मक, बौद्धिक, मानसिक किंवा सामाजिक कार्य करण्याच्या स्तरापर्यंत पोचण्यास आणि तो स्तर राखण्यास सहाय्यभूत होण्याचा उद्देश असलेल्या प्रक्रियेबाबत आहे ;

(ढ) "पुनर्वसन व्यावसायिक" याचा अर्थ,—

(एक) श्रवण तज्ञ आणि वाचा उपचारतज्ञ;

(दोन) चिकित्सा मानसशास्त्रज्ञ;

(तीन) श्रवण उपकरण आणि कर्णसंच तंत्रज्ञ;

(चार) पुनर्वसन अभियंते आणि तंत्रज्ञ;

(पाच) अधू व्यक्तींना शिक्षण आणि प्रशिक्षण देण्यासाठी विशेष शिक्षक ;

(सहा) अधू व्यक्तींशी व्यवहार करणारे व्यावसायिक समुपदेशक, सेवायोजन अधिकारी, पदयोजन अधिकारी ;

(सात) बहुउद्देशीय पुनर्वसन उपचारतज्ञ, तंत्रज्ञ; किंवा

(आठ) केंद्र सरकार परिषदेशी विचारविनियम करून वेळोवेळी अधिसूचित करील असे व्यावसायिकांचे अन्य प्रवर्ग,

असा आहे.

[2][* * * * *]

[3][(१क) या अधिनियमात वापरलेले आणि व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण व पूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ (१९९६ चा १) यात व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अनुक्रमे नेमून दिलेले जे अर्थ असतील तेच अर्थ या अधिनियमात असतील.]

(२) या अधिनियमातील कोणत्याही अधिनियमितीच्या किंवा त्याच्या कोणत्याही तरतुदींच्या ज्या क्षेत्रात अशी अधिनियमिती किंवा अशा तरतुदी अंमलात आलेल्या नसतील त्यांच्या संबंधातील अन्वयार्थ, त्या क्षेत्रामध्ये अंमलात असलेला तत्सम कायदा किंवा तत्सम कायद्याची संबध्द तरतूद, जर काही असेल तर, त्याचा निर्देश म्हणून लावला जाईल.

## प्रकरण दोन

### भारतीय पुनर्वसन परिषद

**भारतीय पुनर्वसन परिषदेची घटना आणि विधिसंस्थापन.**

३. (१) केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे त्या प्रयोजनार्थ नियत करील अशा तारखेस या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, भारतीय पुनर्वसन परिषद नावाची एक परिषद घटित करण्यात येईल.

(२) ही परिषद, अखंड उत्तराधिकार आणि सामान्य मुद्रा असलेला पूर्वोक्त नावाचा निगम निकाय असेल व तिला या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, जंगम आणि स्थावर या दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादित करण्याचा, धारण करण्याचा, आणि तिची विल्हेवाट लावण्याचा आणि संविदा करण्याचा अधिकार असेल आणि उक्त नावाने तिला किंवा तिच्याविरुद्ध दावा दाखल करता येईल.

(३) परिषद खालील सदस्यांनी मिळून बनलेली असेल, ते असे :—

[4][(क) अध्यक्ष हा, केंद्र सरकारद्वारे पुनर्वसन, विकलांग व विशेष शिक्षण या क्षेत्रामधील व्यावसायिक अर्हतेसह प्रशासनामध्ये अनुभव असलेल्या व्यक्तींमधून नियुक्त केला जाईल ;

(ख) केंद्र सरकारद्वारे नामनिर्देशित करण्यात येतील असे, विकलांग व्यक्तींच्या संबंधातील बाबी हाताळणारे केंद्र सरकारच्या मंत्रालयातील प्रतिनिधी, जे सात पेक्षा अधिक नसतील इतके सदस्य ; ]

(ग) केंद्र सरकारद्वारे नियुक्त करण्यात येईल असा, विद्यापीठ अनुदान आयोगाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी एक सदस्य ;

---

१. २००० चा अधिनियम ३८, कलम ३ (१) (तीन) द्वारे खंड (डक) दाखल करण्यात आला (४ सप्टेंबर, २००० रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ (१) (चार) द्वारे गाळण्यात आला (४ सप्टेंबर, २००० रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) द्वारे पोटकलम (१क) नव्याने दाखल करण्यात आले (४ सप्टेंबर, २००० रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (४ सप्टेंबर, २००० रोजी व तेव्हापासून).

(घ) भारतीय वैद्यक संशोधन परिषदेच्या महासंचालनालयाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी केंद्र सरकार नियुक्त करील असा एक सदस्य ;

(ङ) समाज कल्याणाशी संबंधित, राज्ये किंवा संघराज्यक्षेत्राच्या मंत्रालयाचे किंवा विभागाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी केंद्र सरकार, वर्णानुक्रमानुसार आलटून पालटून नियुक्त करील असे, दोन सदस्य ;

(च) स्वेच्छा संघटनांमध्ये काम करणाऱ्या पुनर्वसन व्यावसायिकांमधून केंद्र सरकार नियुक्त करील असे सहापेक्षा जास्त नसतील इतके सदस्य ;

(छ) भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ (१९५६ चा १०२) अन्वये नाव-नोंदणी केलेल्या आणि अधूंच्या पुनर्वसनाचे काम करीत असलेल्या वैद्यक व्यावसायींमधून केंद्र सरकार नियुक्त करील असे चारपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य ;

(ज) संसदेचे तीन सदस्य, ज्यांपैकी लोकसभेद्वारे दोन सदस्य आणि राज्यसभेद्वारे एक सदस्य निवडून देण्यात येतील ;

(झ) विकलांगांना सहाय्य करण्याच्या कामात सक्रिय गुंतलेले असतील अशा सामाजिक कार्यकर्त्यांमधून केंद्र सरकारद्वारे नामनिर्देशित केले जातील असे तीनपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य ;

(ञ) सदस्य-सचिव, पदसिद्ध.

(४) मंडळाच्या सदस्याचे पद, त्याच्या धारकाला संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य म्हणून निवडला जाण्यासाठी किंवा सदस्य होण्यासाठी अपात्र ठरवणार नाही.

**अध्यक्ष व सदस्य यांच्या पदाच्या अटी.**

४. (१) अध्यक्ष आणि सदस्य, त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीपर्यंत, किंवा त्यांच्या उत्तराधिकाऱ्याची यथोचितरीत्या नियुक्ती होईपर्यंत, यांपैकी जो कालावधी अधिक असेल तोपर्यंत पद धारण करील.

(२) परिषदेमधील नैमित्तिक रिक्त पद कलम ३ च्या तरतुदीनुसार भरण्यात येईल आणि त्या जागी नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, ज्या सदस्यांच्या जागी तिची नियुक्ती करण्यात येईल अशा सदस्याने ज्या उर्वरित कालावधीकरिता ते पद धारण केले असते तेवढ्याच कालावधीपुरते ते पद धारण करील.

(३) परिषद नियत करील अशा वेळी आणि अशा ठिकाणी दरवर्षी किमान एकदा तरी, परिषदेची बैठक होईल आणि त्या बैठकीमध्ये, कामकाज करताना विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीच्या नियमांचे पालन करण्यात येईल.

(४) अध्यक्षपदीय व्यक्ती किंवा, जर कोणत्याही कारणामुळे ती परिषदेच्या बैठकीला उपस्थित राहू शकली नाही तर, त्या सभेमध्ये उपस्थित असलेल्या सदस्यांनी आपल्यांमधून निवडून दिलेला कोणताही सदस्य त्या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारील.

(५) परिषदेच्या कोणत्याही सभेसमोर आलेल्या सर्व प्रश्नांवर उपस्थित असलेल्या व मत देणाऱ्या, सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेतले जातील आणि समसमान मते झाल्यास अध्यक्षपदीय व्यक्तीला किंवा त्यांच्या गैरहजेरीत अध्यक्षपद धारण केलेल्या व्यक्तीला दुसरे आणि निर्णायक मत असेल.

**अनर्हता.**

५. कोणतीही व्यक्ती, जर ती,—

(क) विकल मनाची असेल किंवा होईल किंवा सक्षम न्यायालयाद्वारे तसे घोषित केलेले असेल तर; किंवा

(ख) केंद्र सरकारच्या मते, ज्यात नैतिक अधोगती अंतर्भूत आहे अशा कोणत्याही अपराधा-बद्दल सिद्धदोष ठरवलेली असेल किंवा ठरवली गेली असेल तर ; किंवा

(ग) नादार म्हणून अभिनिर्णीत केलेली असेल किंवा कोणत्याही वेळी केली गेली असेल तर,

सदस्य होऊ शकणार नाही.

**सदस्यांनी पद रिक्त करणे.**

६. जर एखादा सदस्य,—

(क) कलम ५ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही अनर्हतेला पात्र होत असेल; किंवा

(ख) परिषदेच्या लागोपाठ तीन सभांना, परिषदेच्या मते जी पुरेशी आहे अशा सबबीशिवाय गैरहजर राहिला असेल ; किंवा

(ग) कलम ३ च्या पोटकलम (३) च्या खंड (छ) मध्ये निर्देशिलेल्या सदस्याच्या बाबतीत त्याचे नाव भारतीय वैद्यकीय नोंदवहीतून काढून टाकले असेल तर, त्यानंतरच त्याचे पद रिक्त होईल.

**कार्यकारी समिती व इतर समित्या.** ७. (१) परिषद आपल्या सदस्यांमधून एक कार्यकारी समिती आणि या अधिनियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी परिषदेस आवश्यक वाटतील अशा साधारण किंवा विशेष प्रयोजनांसाठी अन्य समित्या घटित करील.

(२) कार्यकारी समिती, अध्यक्षपदीय व्यक्ती, जी पदसिद्ध सदस्य असेल आणि परिषदेद्वारे आपल्या सदस्यांमधून नामनिर्देशित करण्यात येतील असे कमीत कमी सात आणि जास्तीत जास्त दहा सदस्य, मिळून बनलेली असेल.

(३) अध्यक्षपदीय व्यक्ती, ही कार्यकारी समितीची अध्यक्षपदीय व्यक्ती असेल.

(४) कार्यकारी समिती किंवा कोणतीही इतर समिती या अधिनियमाद्वारे प्रदान केलेले अधिकार किंवा त्यांच्यावर लादलेली कर्तव्ये याव्यतिरिक्त, परिषद या संदर्भात तयार केलेल्या कोणत्याही विनियमांद्वारे प्रदान करील किंवा सोपवील असे अधिकार वापरील व कर्तव्ये पार पाडील.

**परिषदेचे सदस्य-सचिव आणि कर्मचारी.** ८. (१) केंद्र सरकार, परिषदेकडून विहित करण्यात येतील अशा निदेशानुसार किंवा अध्यक्षपदीय व्यक्तीकडून प्रदान करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करण्याची आणि (अशी कर्तव्ये पार पाडण्यासाठी परिषदेच्या सदस्य-सचिवाची नियुक्ती करील.

(२) परिषद, केंद्र सरकारच्या पूर्व मंजुरीने, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी तिला आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांना आणि इतर कर्मचाऱ्यांना नोकरीवर ठेवील.

(३) परिषद, केंद्र सरकारच्या पूर्व मंजुरीने अध्यक्षपदीय व्यक्ती आणि इतर सदस्य यांना द्यावयाचे भत्ते निश्चित करील आणि परिषदेचे सदस्य-सचिव, अधिकारी आणि इतर कर्मचारी यांच्या सेवेच्या शर्ती निश्चित करील.

**परिषदेतील रिक्त पदांमुळे कृती आदि विधिअग्राह्य न ठरणे.** ९. परिषदेचे किंवा तिच्या कोणत्याही समितीचे कार्य किंवा कार्यवाही, परिषदेतील किंवा तिच्या कोणत्याही समितीतील केवळ रिक्त पदाच्या कारणास्तव किंवा, यथास्थिति, तिच्या घटनेतील त्रुटीच्या कारणास्तव प्रश्नास्पद करण्यात येणार नाही.

**पुनर्वसन परिषदेचे विघटन करण आणि पुनर्वसन परिषदेच्या अधिकारांचे, दायित्वांचे व कर्मचाऱ्यांचे परिषदेकडे हस्तांतरण करणे.** १०. (१) परिषद घटित होण्याच्या दिनांकास व तेव्हापासून पुनर्वसन समिती विघटित होईल आणि असे विघटन झाल्यावर,—

(क) पुनर्वसन परिषदेची किंवा तिच्या मालकीची सर्व जंगम व स्थावर मालमत्ता व सत्ता परिषदेकडे निहित होईल;

(ख) पुनर्वसन परिषदेचे सर्व अधिकार व दायित्वे परिषदेकडे हस्तांतरित होतील व ते अधिकार व दायित्वे परिषदेची होतील ;

(ग) खंड (ख) च्या तरतुदींना बाध न आणता, उक्त पुनर्वसन परिषदेच्या प्रयोजनांसाठी किंवा त्यासंबंधात पुनर्वसन परिषदेकडून परिषदेशी किंवा परिषदेकरिता त्या दिनांकाच्या लगतपूर्वी उद्भवलेली सर्व दायित्वे, केलेल्या सर्व संविदा आणि करण्यासाठी वचनबद्ध असलेल्या सर्व बाबी व गोष्टी परिषदेकडून, तिच्याशी किंवा तिच्याकरिता उद्भवण्याचे किंवा करण्यात आल्याचे किंवा करण्यासाठी वचनबद्ध असल्याचे समजण्यात येईल ;

(घ) पुनर्वसन परिषदेला त्या दिनांकाच्या लगतपूर्वी देय असलेल्या सर्व रकमा, परिषदेस देय असल्याचे समजण्यात येईल ;

(ङ) त्या दिनांकाच्या लगतपूर्वी पुनर्वसन परिषदेद्वारा किंवा तिच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेले किंवा दाखल करता आले असते असे सर्व दावे व अन्य कायदेशीर कार्यवाही ही परिषदेकडून किंवा तिच्याविरुद्ध चालू ठेवण्यात येईल किंवा दाखल करण्यात येईल ; आणि

(च) त्या दिनांकाच्या लगतपूर्वी पुनर्वसन परिषदेचे कोणतेही पद धारण केलेला प्रत्येक कर्मचारी हा, परिषद घटित झाली नसती तर त्याने आपले पद ज्या पदावधीपर्यंत आणि पारिश्रमिक, रजा, भविष्यनिर्वाह निधी, सेवानिवृत्ती आणि इतर सेवांत लाभ यांच्याबाबतीतील ज्या अटी व शर्तींवर धारण केले असते त्याच पदावधीपर्यंत आणि त्याच अटी व शर्तींवर धारण करील आणि तो परिषदेचा कर्मचारी म्हणून असे पद धारण करीत राहील किंवा त्याने जर त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत परिषदेचा कर्मचारी न राहण्याचा विकल्प दिला तर तो कालावधी समाप्त होईपर्यंत ते पद धारण करील.

(२) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ यामध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परिषदेकडून या कलमाखाली कोणत्याही कर्मचाऱ्याला त्याच्या नियत सेवेत समाविष्ट करण्यात आल्यामुळे, अशा कर्मचाऱ्याला त्या अधिनियमान्वये किंवा अन्य कायद्यान्वये कोणतीही भरपाई मिळण्याचा हक्क प्राप्त होणार नाही किंवा कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा अन्य प्राधिकरण असा दावा दाखल करून घेणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमात, "पुनर्वसन परिषद" याचा अर्थ,—

सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) खाली बनवण्यात आलेली व नोंदणी केलेली सोसायटी असलेली व परिषद घटित होण्यापूर्वी कार्यरत असलेली पुनर्वसन परिषद, असा आहे.

## प्रकरण तीन

### परिषदेची कार्ये

**भारतातील विद्यापीठ, इत्यादींकडून पुनर्वसन व्यावसायिकांना दिलेल्या अर्हतांना मान्यता.**

११. (१) कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा अनुसूचीमध्ये अंतर्भाव करण्यात आलेल्या अशा भारतातील अन्य संस्थांकडून देण्यात आलेल्या अर्हता, त्या पुनर्वसन व्यावसायिकांसाठी मान्यता प्राप्त अर्हता असतील.

(२) अनुसूचीमध्ये अंतर्भाव करण्यात न आलेल्या अर्हता पुनर्वसन व्यावसायिकांना प्रदान करणारे कोणतेही विद्यापीठ किंवा अन्य संस्था अशा कोणत्याही अर्हतेस मान्यता मिळण्यासाठी केंद्र सरकारकडे अर्ज करू शकेल व केंद्र सरकार, परिषदेशी विचार विनिमय केल्यानंतर अधिसूचनेद्वारे, अनुसूचीमध्ये त्या अर्हतेचा अंतर्भाव करण्याकरिता ही सुधारणा करील आणि अशा अधिसूचनेमध्ये, अनुसूचीच्या शेवटच्या स्तंभात अर्हतेसमोर अशी नोंद करण्यात यावी की, विनिर्दिष्ट दिनांकानंतर देण्यात आलेली अर्हताच मान्य करण्यात येईल, असा निदेश देखील देण्यात येईल.

**भारताबाहेरील संस्थाकडून देण्यात येणाऱ्या अर्हतांना मान्यता.**

१२. परिषद, भारताबाहेरील कोणत्याही देशातील प्राधिकरणाबरोबर अर्हतांच्या मान्यतेसाठी परस्परांत आदान प्रदान करण्याची योजना निश्चित करण्यासाठी वाटाघाटी करील आणि अशा कोणत्याही योजनेच्या अनुसार, केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे, परिषदेने मान्यता देण्याचे ठरविलेली कोणतीही अर्हता अनुसूचीमध्ये समाविष्ट करण्यासाठी त्यात सुधारणा करील आणि अशा अधिसूचनेद्वारे असाही निदेश-देईल की, विनिर्दिष्ट दिनांकानंतर देण्यात आलेल्या अर्हताच फक्त मान्यताप्राप्त असतील असे त्या अधिसूचनेच्या शेवटच्या स्तंभामध्ये नोंदविण्यात येईल.

**अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेल्या अर्हता धारण केलेल्या व्यक्तींच्या नावाची नोंदणी होण्याचा हक्क.**

१३. (१) या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या अन्य तरतुदींना अधीन राहून, अनुसूचीमध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही अर्हता, नोंदवहीमध्ये नाव नोंदणीसाठी पुरेशी अर्हता असेल.

(२) ज्याने मान्यताप्राप्त पुनर्वसन अर्हता धारण केलेली आहे आणि नोंदवहीमध्ये त्याचे नाव नोंदलेले आहे अशा पुनर्वसन व्यावसायिकाखेरीज अन्य कोणतीही व्यक्ती,—

(क) पुनर्वसन व्यावसायिक या नात्याने एखादे पद किंवा शासनामधील किंवा कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाद्वारे चालवण्यात येणाऱ्या संस्थेमधील कोणतेही असे पुनर्वसन व्यावसायिकाचे पद (ज्या पदास कोणत्याही पदनामाने संबोधण्यात येत असो) धारण करणार नाही.

(ख) भारतात कोठेही पुनर्वसन व्यावसायिक म्हणून व्यवसाय करणार नाही ;

(ग) कोणत्याही प्रमाणपत्रावर कोणत्याही कायद्याखाली पुनर्वसन व्यावसायिकाने स्वाक्षरी किंवा अधिप्रमाणित करणे अपेक्षित आहे असे कोणतेही प्रमाणपत्र स्वाक्षरित किंवा अधिप्रमाणित करण्यास हक्कदार असणार नाही ;

(घ) भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा १) याच्या कलम ४५ अन्वये तज्ज्ञ म्हणून कोणत्याही न्यायालयात कोणत्याही अधू व्यक्तींच्या संबंधातील बाबींमध्ये कोणतीही साक्ष देण्यास हक्कदार असणार नाही :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस एखाद्या व्यक्तीने मान्यताप्राप्त पुनर्वसन व्यावसायिक अर्हता धारण केलेली असेल तर ती व्यक्ती अशा प्रारंभाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी नाव नोंदलेली पुनर्वसन व्यावसायिक असल्याचे मानण्यात येईल आणि तिने उक्त सहा महिन्यांच्या कालावधीत नोंदवहीत नाव नोंदणीसाठी अर्ज केला असेल तर असा अर्ज निकालात काढण्यात येईपर्यंत तिला पुनर्वसन व्यावसायिक असल्याचे मानण्यात यईल.

[1][(२क) पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, भौतिक औषध वैद्यकशास्त्र व पुनर्वसन, अस्थिव्यंगोपचारशास्त्र, कान, नाक किंवा घसा (इएनटी), नेत्रचिकित्साशास्त्र किंवा मनोविकृतिचिकित्साशास्त्र या क्षेत्रातील डॉक्टर किंवा निम्न वैद्यक असणारी व्यक्ती केंद्र सरकार किंवा राज्य शासन यांच्याकडून निधी देण्यात आलेला अन्य इतर निगम निकाय यांच्या मालकीच्या किंवा नियंत्रित कोणत्याही रुग्णालयात किंवा आस्थापनेत सेवेत असेल किंवा काम करीत असेल आणि केंद्र सरकारद्वारे अधिसूचित करण्यात आल्यानंतर ती, त्या पोटकलमाच्या खंड (क) ते (घ) मध्ये निर्देशित केलेली कार्ये पार पाडील.]

(३) पोटकलम (२) च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करून कृती करणारी कोणतीही व्यक्ती एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा रुपये एक हजारपर्यंत असू शकेल इतक्या रकमेच्या दंडास किंवा दोन्ही शिक्षास पात्र असेल.

**अभ्यास पाठ्यक्रमाची व परीक्षा यांची माहिती मागवण्याचा अधिकार.**

१४. ज्या मान्यताप्राप्त अर्हता दिल्या जातात असे भारतातील प्रत्येक विद्यापीठ व संस्था, यांना, अशी अर्हता प्राप्त करण्यासाठीचे अभ्यासक्रम व त्यानुसार घेण्यात येणाऱ्या परीक्षा तसेच असे अभ्यासक्रम व परीक्षा किंवा अशी अर्हता प्रदान करण्यात येते ते वय आणि साधारणतः अशी अर्हता प्राप्त करण्यासाठीची आवश्यक माहिती परिषदेकडून वेळोवेळी देण्यात येईल.

---

१. २००० चा अधिनियम ३८, कलम ५ द्वारे पोटकलम (२क) दाखल करण्यात आले (४ सप्टेंबर, २००० रोजी व तेव्हापासून).

**परीक्षांचे निरीक्षक.** १५. (१) परिषद, जेथे पुनर्वसन व्यावसायिक म्हणून व्यवसाय करण्याबाबत प्रशिक्षण दिले जाते असे कोणतेही विद्यापीठ किंवा संस्था यांची तपासणी करण्यासाठी किंवा त्या विद्यापीठाकडून किंवा संस्थे-कडून देण्यात येणाऱ्या अर्हतांना मान्यताप्राप्त पुनर्वसन अर्हता म्हणून मान्यता मिळण्यासाठी केंद्र सरकार-कडे शिफारस करण्याच्या प्रयोजनाकरिता, त्या विद्यापीठाद्वारे किंवा संस्थेद्वारे घेतल्या जाणाऱ्या परीक्षांना उपस्थित राहण्यासाठी परिषदेला आवश्यक वाटतील इतके निरीक्षक नियुक्त करील.

(२) पोटकलम (१) खाली नियुक्त केलेले निरीक्षक कोणतेही प्रशिक्षण किंवा परीक्षा यांच्या आयोजनात हस्तक्षेप करणार नाहीत, परंतु, ते शिक्षणाचा दर्जा तसेच कर्मचारी वर्ग, साधनसामग्री, जागेची व्यवस्था, प्रशिक्षण व असे शिक्षण देण्यासाठी विहित केलेल्या अन्य सुविधा यांच्या पुरेशा प्रमाणाबाबत किंवा ज्या परीक्षांना ते हजर राहतील त्या परीक्षांच्या पर्याप्ततेबाबत परिषदेला अहवाल देतील.

(३) परिषद, पोटकलम (२) अन्वये निरीक्षकाने दिलेल्या अहवालांची एक प्रत संबंधित विद्या-पीठाला किंवा संस्थेला पाठवील आणि त्यावरील विद्यापीठ किंवा संस्थेच्या शेऱ्यासह त्याची एक प्रत केंद्र सरकारकडे पाठवील.

**परीक्षेचे वीक्षक.** १६. (१) परिषदेला, ज्या कोणत्याही विद्यापीठात किंवा संस्थेत पुनर्वसन व्यावसायिक शिक्षण देण्यात येते अशा विद्यापीठाची किंवा संस्थेची तपासणी करण्यासाठी किंवा मान्यताप्राप्त पुनर्वसन अर्हता देण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही परीक्षेस हजर राहण्यासाठी, तिला आवश्यक वाटतील इतके वीक्षक नियुक्त करता येतील.

(२) कोणत्याही व्यक्तीची ती परिषदेची सदस्य असली किंवा नसली तरीही, पोटकलम (१) खाली वीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात येईल, परंतु कलम १५, पोटकलम (१) खाली ज्या व्यक्तीची, कोणतीही तपासणी किंवा परीक्षा यासाठी निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असेल, अशा व्यक्तीस, त्याच तपासणीसाठी किंवा परीक्षेसाठी वीक्षक म्हणून नियुक्त करण्यात येणार नाही.

(३) वीक्षक, कोणत्याही प्रशिक्षणाच्या किंवा परीक्षेच्या कामात हस्तक्षेप करणार नाही, परंतु शिक्षणाचा दर्जा तसेच कर्मचारीवर्ग, साधनसामग्री, जागेची व्यवस्था, प्रशिक्षण आणि पुनर्वसन व्यावसा-यिकांना शिक्षण देण्यासाठी विहित केलेल्या इतर सुविधा यांच्या पुरेशा प्रमाणाबाबत किंवा तो ज्या परीक्षेला हजर असेल अशा प्रत्येक परीक्षेच्या पर्याप्ततेबाबत अध्यक्षपदीय व्यक्तीकडे अहवाल सादर करील.

(४) वीक्षकांचा अहवाल, अध्यक्षाने एखाद्या विशिष्ट बाबीसंबंधात अन्यथा निर्देश दिला नसेल तर गोपनीय समजण्यात येईल :

परंतु, केंद्र सरकारने वीक्षकाच्या अहवालाच्या प्रतीची मागणी केल्यास, परिषद त्या अहवालाची प्रत त्यास देईल.

**मान्यता काढून घेणे.** १७. (१) निरीक्षक किंवा वीक्षकाच्या अहवालावरून परिषदेला, जर असे दिसून आले की—

(क) कोणत्याही विद्यापीठातील किंवा संस्थेतील अभ्यास पाठ्यक्रम व द्यावयाची परीक्षा किंवा त्यांच्याकडून घेतल्या जाणाऱ्या कोणत्याही परीक्षेमधील उमेदवारांचे अपेक्षित प्राविण्य ; किंवा

(ख) अशा विद्यापीठातील किंवा संस्थेतील कर्मचारीवर्ग, साधनसामग्री, जागेची व्यवस्था प्रशिक्षण तसेच त्यामध्ये देण्यात येणारे शिक्षण व प्रशिक्षण यांच्या अन्य सुविधा,

परिषदेकडून विहित करण्यात आलेल्या दर्जानुसार नाही अशी परिषदेची खात्री झाल्यास परिषद केंद्र सरकारकडे तशा अर्थाचे प्रतिवेदन करील.

(२) केंद्र सरकार असे प्रतिवेदन विचारात घेतल्यावर ते त्या विद्यापीठाकडे किंवा संस्थेकडे पाठवील आणि त्या विद्यापीठाने किंवा संस्थेने किती कालावधीत आपले स्पष्टीकरण केंद्र सरकारकडे पाठवावे तो कालावधी त्यांना कळवील.

(३) स्पष्टीकरण मिळाल्यावर किंवा जेथे निश्चित झालेल्या कालावधीत स्पष्टीकरण सादर करण्यात आलेले नसेल अशा वेळी त्या कालावधीच्या समाप्तीनंतर, केंद्र सरकारला, त्याला योग्य वाटेल अशी पुढील चौकशी केल्यावर अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, अनुसूचीमध्ये उक्त मान्यताप्राप्त पुनर्वसन अर्हतेच्या समोर, ती अर्हता विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी देण्यात आली असेल तरच ती मान्यताप्राप्त पुनर्वसन अर्हता ठरेल असे, किंवा उक्त मान्यताप्राप्त पुनर्वसन अर्हता विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी, विनिर्दिष्ट विद्यापीठाच्या किंवा संस्थेच्या विद्यार्थ्यांना देण्यात आली असेल तरच ती मान्यताप्राप्त पुनर्वसन अर्हता ठरेल असे, किंवा यथास्थिति, विनिर्दिष्ट विद्यापीठाच्या किंवा संस्थेच्या संबंधात ती अर्हता विनिर्दिष्ट दिनांकानंतर देण्यात आली असेल तर ती मान्यताप्राप्त पुनर्वसन अर्हता ठरेल असे, घोषित करणारी नोंद करण्यात यावी.

**शिक्षणाचा किमान दर्जा.** १८. परिषद, भारतामधील विद्यापीठे किंवा संस्था यांच्याकडून मान्यताप्राप्त पुनर्वसन अर्हता देण्यासाठी हवा असलेला शिक्षणाचा किमान दर्जा विहित करील.

**नोंदवहीत नोंदणी करणे.** १९. परिषदेचा सदस्य-सचिव, कोणत्याही व्यक्तीने विहितरीत्या केलेला अर्ज मिळाल्यावर नोंद-वहीत तिचे नाव नोंदवील, मात्र, अशा व्यक्तीकडे मान्यताप्राप्त पुनर्वसन अर्हता आहे, याबद्दल सदस्य-सचिवाची खात्री पटली पाहिजे;

[1][परंतु, परिषद, त्या मंत्रालयाच्या शिफारशीवरून, कामगार मंत्रालयाखालील व्यावसायिक पुनर्वसन केंद्रामध्ये काम करणाऱ्या व्यावसायिक अनुदेशक व इतर कर्मचारी यांची नाव नोंदणी करील आणि व्यावसायिक पुनर्वसन केंद्रांना मनुष्यबळ विकास केंद्रे म्हणून मान्यता देईल :

परंतु, आणखी असे की, परिषद, त्या मंत्रालयाच्या शिफारशीवरून सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाखालील विकलांगांच्या राष्ट्रीय संस्थांमध्ये व शिखर संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचारी वर्गाची नावनोंदणी करील आणि विकलांगांच्या राष्ट्रीय संस्थांना व शिखर संस्थांना मनुष्यबळ विकास केंद्रे म्हणून मान्यता देईल.]

**ज्यांची नोंदवहीत नोंदणी झाली आहे अशा व्यक्तींचे विशेषाधिकार.**

२०. या अधिनियमात ठरवून दिलेल्या शर्ती व निर्बंध यांना अधीन राहून, मान्यताप्राप्त पुनर्वसन अर्हताप्राप्त असलेल्या व्यक्तींनी अधू व्यक्तींच्या पुनर्वसनाचे कार्य करण्यासंबंधात जिचे नाव त्यावेळी नोंदवहीत नोंदवण्यात आलेले आहे अशी प्रत्येक व्यक्ती, भारताच्या कोणत्याही भागात पुनर्वसन व्यावसायिक म्हणून कार्य करण्यास आणि, अशा पुनर्वसन कार्याबाबत त्यावेळच्या कायद्यानुसार, औषधी किंवा अन्य साधन याच्या संबंधातील जो खर्च, आकार किंवा कोणतीही फी मिळण्याचा त्यास हक्क असेल ती वसूल करील.

**व्यावसायिक आचरण आणि नोंदवहीतून नावे काढून टाकणे.**

२१. (१) परिषदेस, पुनर्वसन व्यावसायिकासाठी व्यावसायिक आचरणाची आणि शिष्टाचाराची मानके आणि आचारसंहिता विहित करता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये परिषदेद्वारे केलेल्या विनियमांमध्ये त्या विनियमांचा कोणत्याही प्रकारचा भंग ही एखाद्या व्यवसायासंबंधातील बदनामीकारक वागणूक, म्हणजे व्यावसायिक गैरवर्तणूक ठरेल, हे विनिर्दिष्ट करता येईल आणि त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, अशी तरतूद प्रभावी होईल.

(३) परिषद, कोणत्याही व्यक्तीचे नाव, त्या व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची योग्य संधी दिल्यावर आणि तिला योग्य वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर, जर परिषदेची पुढील बाबतीत खात्री पटली तर,—

(एक) तिचे नाव चुकीने किंवा विपर्यास करून किंवा कोणतीही महत्त्वाची वस्तुस्थिती दडपून ठेवल्या कारणाने नोंदवहीत समाविष्ट करण्यात आले असेल ;

(दोन) ती कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धदोषी ठरवलेली आहे किंवा, कोणत्याही व्यवसायासंबंधात बदनामीकारक वागणुकीमुळे दोषी ठरलेली आहे किंवा पोटकलम (१) मध्ये विहित केलेले व्यवसायिक आचरण आणि शिष्टाचार यांच्या मानकांचे किंवा आचारसंहितेचे तिने उल्लंघन केलेले आहे आणि त्यामुळे तिचे नाव नोंदवहीत ठेवण्यास ती परिषदेच्या मते अपात्र ठरली तर,

त्याचे नाव नोंदवहीतून काढून टाकण्याचे आदेश देईल.

(४) पोटकलम (३) खालील आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, जिचे नाव नोंदवहीमधून काढून टाकण्याबाबत आदेश झालेला आहे, अशी कोणतीही व्यक्ती या अधिनियमान्वये कायमची किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल तेवढ्या वर्षासाठी नाव नोंदणी करण्यास अपात्र राहील.

**नोंदवहीमधून नाव काढून टाकण्याच्या आदेशाविरुद्ध अपील.**

२२. (१) जेव्हा कोणत्याही व्यक्तीचे नाव, तिच्याकडे आवश्यक पुनर्वसन अर्हता नाही या कारणाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणावरून नोंदवहीमधून काढून टाकण्यात आले असेल तेव्हा ती व्यक्ती विहित रीतीने आणि विहित करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून, यात फी देण्याबाबतच्या शर्तीचाही समावेश असेल त्याबाबत केंद्र सरकारकडे अपील करू शकेल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

(२) पोटकलम (१) खालील कोणतेही अपील जर ते कलम २१ च्या पोटकलम ३ अन्वये देण्यात आलेल्या आदेशाच्या दिनांकापासून [2][साठ दिवसांचा कालावधी] समाप्त झाल्यानंतर करण्यात आले असेल तर दाखल करून घेतले जाणार नाही :

परंतु, अपीलकर्त्याने जर, उक्त कालावधीमध्ये अपील न करण्यास त्याच्याकडे पुरेसे कारण होते याबाबत केंद्र सरकारची खात्री झाली तर [2][साठ दिवसांचा उक्त कालावधी] समाप्त झाल्यानंतरही अपील दाखल करून घेतले जाईल.

**नोंदवही.**

२३. (१) सदस्य-सचिव, या अधिनियमाच्या तरतुदींच्या आणि परिषदेने केलेल्या कोणत्याही आदेशाच्या अनुसार नोंदवही ठेवील आणि वेळोवेळी त्या नोंदवहीत सुधारणा करील आणि ती शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करील.

(२) अशी नोंदवही, भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा १) याच्या अर्थानुसार सार्वजनिक दस्तऐवज असल्याचे मानले जाईल आणि त्याच्या प्रतीद्वारे सिद्ध केले जाऊ शकेल.

---

१. २००० चा अधिनियम ३८, कलम ६ द्वारे परंतुके दाखल करण्यात आली (४ सप्टेंबर, २००० रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (४ सप्टेंबर, २००० रोजी व तेव्हापासून).

**परिषदेद्वारे दिली जाणारी माहिती आपल्या आणि तिचे प्रकाशन.** २४. (१) केंद्र सरकारला, परिषद, ते सरकार मागवील असे अहवाल, आपल्या कार्यवृत्तांच्या प्रती, लेख्यांचे गोषवारे आणि इतर माहिती सादर करील.

(२) केंद्र सरकारला, या कलमाअन्वय किंवा कलम १६ अन्वये, परिषदेने सादर केलेले कोणतेही अहवाल, प्रत, गोषवारा किंवा इतर माहिती त्यास योग्य वाटेल अशा रीतीने प्रसिद्ध करता येतील.

**अपराधांची दखल.** २५. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, न्यायालय, परिषदेने त्या संदर्भात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने लेखी तक्रार केल्याशिवाय, या, अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

**सद्भावपूर्वक केल्या गेलेल्या कारवाईस संरक्षण.** २६. या अधिनियमान्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही गोष्टी-बद्दल केंद्र सरकार, परिषद, अध्यक्ष, सदस्य, सदस्य-सचिव किंवा परिषदेचा कोणताही अन्य अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कारवाई दाखल करण्यात येणार नाही.

**परिषदेचे कर्मचारी लोकसेवक असणे.** २७. परिषदेचे अध्यक्ष, सदस्य, सदस्य-सचिव, अधिकारी आणि इतर कर्मचारी, जेव्हा या अधि-नियमाच्या तरतुदी किंवा त्याखाली करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा विनियम यांच्या अनुसार कार्य करीत असतील किंवा करीत असल्याचे अभिप्रेत असेल तेव्हा ते भारतीय दंड संहिता, (१८६० चा ४५) कलम २१ याच्या अर्थान्तर्गत लोकसेवक असल्याचे मानले जाईल.

**नियम करण्याचा अधिकार.** २८. केंद्र सरकारला या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणण्यासाठी अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

**विनियम करण्याचा अधिकार.** २९. परिषदेला, केंद्र सरकारच्या पूर्वमंजुरीने, सर्वसाधारणपणे या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणण्यासाठी अधिसूचनेद्वारे विनियम करता येतील आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता, अशा विनियमामध्ये पुढील बाबींसाठी तरतुदी करता येतील,—

(क) परिषदेच्या मालमतेचे व्यवस्थापन करणे ;

(ख) परिषदेचे लेखे ठेवण व त्यांची लेखापरीक्षा करणे ;

(ग) परिषदेच्या सदस्यांचे राजीनामे ;

(घ) अध्यक्षाचे अधिकार आणि कर्तव्ये ;

(ङ) कलम ४ च्या पोटकलम (३) अन्वये कामकाज चालवण्याच्या कार्यपद्धतीचे नियम ;

(च) कलम ७ अन्वये घटित केलेल्या कार्यकारी समितीचे आणि इतर समित्यांचे कार्य ;

(छ) कलम ८ च्या पोटकलम (१) अन्वये सदस्य-सचिवाचे अधिकार आणि कर्तव्ये ;

(ज) निरीक्षक आणि वीक्षक यांची अर्हता, नियुक्ती, अधिकार व कर्तव्ये आणि त्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(झ) कोणत्याही विद्यापीठात किंवा संस्थेमध्ये, मान्यताप्राप्त पुनर्वसन अर्हता देण्यासाठीचा पाठ्यक्रम आणि अभ्यासाचा किंवा प्रशिक्षणाचा कालावधी, परीक्षांचे विषय आणि त्यामध्ये मिळवावयाच्या प्राविण्याचा दर्जा ;

(ञ) पुनवसन व्यावसायिकाचा अभ्यास किंवा प्रशिक्षण यासाठी असलेला प्रमाणबरहुकूम कर्मचारी वर्ग, साधनसामग्री, जागेची व्यवस्था, प्रशिक्षण आणि इतर सुविधा ;

(ट) परीक्षांचे संचालन, परीक्षकांची अर्हता आणि अशा परीक्षांना प्रवेश देण्याबाबतची शर्त ;

(ठ) कलम २१ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व्यावसायिकांनी पालन करावयाच्या व्यावसायिक आचारणाचा आणि शिष्टाचाराचा दर्जा आणि आचारसंहिता ;

(ड) या अधिनियमाअन्वये नोंदणी करण्यासाठी केलेल्या अर्जात नमूद करावयाचा तपशील आणि द्यावयाच्या अर्हतेचा पुरावा ;

(ढ) कलम २२ च्या पोटकलम (१) अन्वये ज्या रीतीने आणि ज्या शर्तींना अधीन राहून अर्ज करता येईल ती रीत व त्या शर्ती ;

(ण) या अधिनियमान्वये करावयाच्या अर्जावर आणि अपिलांवर देय असलेली फी ;

(त) विहित करण्यात यावयाची किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

**नियम आणि विनियम संसदेसमोर मांडणे.** ३०. या अधिनियमाखाली करण्यात आलेला प्रत्येक नियम आणि प्रत्येक विनियम तो तयार करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता

सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राचा किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात, विनियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, अथवा तो नियम, विनियम करण्यात येवू नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम, विनियम अशा आपरिवर्तित रुपातच परिणामक होईल किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली, किंवा विनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

## अनुसूची

(कलम ११ पहा)

### भारतातील विद्यापीठे किंवा संस्था यांनी दिलेल्या मान्यताप्राप्त पुनर्वसन अर्हता

| विद्यापीठ/संस्था (१) | पाठ्यक्रमाचे नाव (२) | अर्हता (३) | शेरा (४) |
|---|---|---|---|
| **एक—पुनर्वसन अभियंते/तंत्रज्ञ** | | | |
| नॅशनल इन्स्टिटयूट फॉर दी आर्थोपिडिकली हॅन्डीकॅप, बी. टी. मार्ग, बोनहुगली, कलकत्ता-७०० ०९०. | प्रॉस्थेटिक्स आणि ऑर्थोटिक अभियांत्रिकीमधील पदविका (२ वर्षे) | पदविका | |
| डिपार्टमेंट ऑफ रिहॅबिलिटेशन, सफदरजंग हॉस्पिटल, नवी दिल्ली. | प्रॉस्थेटिक्स आणि ऑर्थोटिक्समधील पाठ्यक्रम (३ वर्षे) | पदविका | |
| गव्हर्नमेंट इन्स्टिटयूट ऑफ रिहॅबीलिटेशन ऑफ मेडिसिन, के. के. नगर, मद्रास-६०० ०८३. | ऑर्थोटिक्स आणि प्रॉस्थेटिक्समधील पदविका | पदविका | |
| नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ रिहॅबिलिटेशन ट्रेनिंग अँड रिसर्च, औलातपूर, पी. ओ. बैरोई, जि. कटक, (ओरिसा). | प्रॉस्थेटिक्स आणि ऑर्थोटिक्स अभियांत्रिकी मधील पदविका (२ वर्षे) | पदविका | |
| ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ फिजिकल मेडिसिन अँड रिहॅबिलिटेशन, हाजी अली, खाडये मार्ग, महालक्ष्मी, मुंबई-४०० ०३४. | बी एस.सी. (पी. अँड ओ.) | पदवी | |
| स्कूल ऑफ प्रॉस्थेटिक्स अँड ऑर्थोटिक्स, के. के. नगर, मद्रास-६०० ०८३. | प्रॉस्थेटिक्स आणि ऑर्थोटिक्स अभियांत्रिकीमधील पदविका (२ वर्षांचा कालावधी) | पदविका | |
| श्रेफलीन लेप्रसी रिसर्च अँड ट्रेनिंग सेंटर, कारीगिरी, एस. एल. आर. सॅनेटोरीअम, पी. ओ. उत्तर अर्कॉट जिल्हा [दक्षिण भारत]. | प्रॉस्थेटिक तंत्रज्ञ पाठ्यक्रम (१८ महिने) | पदविका | |
| **दोन—श्रवण तज्ज्ञ आणि वाचा उपचार पद्धती** | | | |
| ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ स्पिच अँड हिअरींग, मानस गंगोत्री, म्हैसूर-५७६ ००६. | बी.एस.सी. (वाचा आणि श्रवणशक्ती) (३ वर्षांचा कालावधी) | पदवी | |
| अलीयावर जंग नॅशनल इन्स्टिटयूट फॉर दी हिअरिंग हॅन्डीकॅप्ड, वांद्रे (प.), मुंबई-४०० ०५०. | बी.एस.सी. (श्रवण आणि वाचा उपचार तज्ज्ञ) (३ वर्षांचा कालावधी) | पदवी | |
| पोस्ट-ग्रॅज्युएट इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल एज्युकेशन अॅन्ड रिसर्च, चंदीगड-१६० ०१२. | बी.एस.सी. (वाचा आणि श्रवणशक्ती) (३ वर्षांचा कालावधी) | पदवी | |
| टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज आणि बीवायएल नायर चॅरिटेबल हॉस्पिटल, डॉ. ए. एल. नायर रोड, मुंबई-४०० ००८. | श्रवणशक्ती आणि वाचा उपचारपद्धतीमधील पदविका (बी.एस.सी.) | पदविका | |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ<br>मेडिकल सायन्सेस,<br>अन्सारीनगर, नवी दिल्ली. | वाचा आणि श्रवणशक्ती मधील<br>बी. एस. सी. (ऑनर्स.) | पदवी | |

**तीन विकलांगांच्या विशेष शाळांसाठी आणि एकात्मिकृत शाळांसाठी शिक्षक**

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. के. एल. इन्स्टिटयूट<br>फॉर दि डेफ ५१, विद्यानगर,<br>भावनगर ३६४ ००२ (गुजरात). | बहिऱ्यांसाठी शिक्षक प्रशिक्षण<br>(१ वर्षाचा कालावधी) | पदविका | |
| दि एज्युकेशनल ऑडियोलॉजी<br>अन्ड रिसर्च सेंटर स्कूल फॉर दि डेफ,<br>"पुनम" ६७, नेपीयनसी रोड,<br>मुंबई ४०० ००६. | बहिऱ्यांच्या शिक्षकांसाठी<br>प्रमाणपत्र पाठ्यक्रम<br>(१० महिन्यांचा कालावधी) | प्रमाणपत्र | |
| श्री. आर. रुईया मूक-बधीर विद्यालय,<br>पुणे-३०. | बहिऱ्या विद्यार्थ्यांसाठी<br>शिक्षक प्रशिक्षण पदविका पाठ्यक्रम<br>(१ वर्षाचा कालावधी) | पदविका | |
| लिटल फ्लॉवर कॉन्व्हेन्ट हायर सेकंडरी<br>स्कूल फॉर दि डेफ, १२७, जी. एन. रोड,<br>कॅथेड्रल पी. ओ. मद्रास ६०० ००६. | (एक) बहिऱ्यांच्या अध्यापनामधील<br>कनिष्ठ पदविका<br>(दोन) बहिऱ्यांच्या<br>अध्यापनामधील वरिष्ठ<br>पदविका<br>(१० महिन्यांचा कालावधी) | पदविका<br>पदविका | |
| दि ब्लाईंड रिलिफ असोसिएशन,<br>लालबहादूर शास्त्री मार्ग,<br>नवी दिल्ली ११० ००३. | अंधांच्या शिक्षकांच्या<br>प्रशिक्षणासाठी एक वर्षाचा<br>पदविका पाठ्यक्रम | पदविका | |
| दि क्लार्क स्कूल फॉर दि डेफ, साधना, क्र. ३,<br>तिसरी मार्ग, डॉ. राधाकृष्णन रोड,<br>मौयलापूरे, मद्रास ६०० ००४. | (एक) बहिऱ्यांसाठी शिक्षक<br>प्रशिक्षण<br>(दोन) मतिमंदांसाठी<br>शिक्षक प्रशिक्षण | पदविका<br>पदविका | |
| रामकृष्ण मिशन ब्लाईंड बॉईज ॲकॅडमी,<br>नरेंद्रपूर ७४३ ५०८ (पश्चिम बंगाल). | (एक) अधू दृष्टीच्या व्यक्तींसाठी<br>सेवाप्रवेशोत्तर प्राथमिकस्तर<br>शिक्षक<br>(१८ महिन्यांचा कालावधी)<br>(दोन) अधू दृष्टीच्या व्यक्तींसाठी<br>माध्यमिक स्तर शिक्षक<br>(१० महिन्यांचा कालावधी) | पदविका<br>पदविका | |
| गव्हर्नमेंट हायर सेकंडरी<br>स्कूल फॉर दि ब्लाईंड, पुनामल्ली,<br>मद्रास ६०० ०५६. | (एक) अंधांच्या अध्यापनातील<br>पदविका<br>(६ महिने शाळेत + १२ महिने<br>पत्रव्यवहाराद्वारे)<br>(दोन) अंधांच्या अध्यापनासाठी<br>विशेष परीक्षा<br>(१० महिन्यांचा पाठ्यक्रम) | पदविका<br>प्रमाणपत्र | |
| अलीयावर जंग नॅशनल इन्स्टिटयूट फॉर<br>दि हिअरींग हॅन्डीकॅप्ड, वांद्रे (प.),<br>मुंबई ४००.०५०. | (ए)) बी. एड. (बहिरा)<br>(दोन) प्रादेशिक भाषेमध्ये<br>डी. एड. (बहिरा) | पी. जी. पदविका<br>पदविका | |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| **चार-बहुउद्देशीय पुनर्वसन उपचार तज्ञ तंत्रज्ञ/सहायक/कार्यकर्ता** | | | |
| डिपार्टमेंट ऑफ रिहॅबिलिटेशन, सफदरजंग हॉस्पिटल, नवी दिल्ली ११० ०२९. | बहुउद्देशीय पुनर्वसन कार्यकर्त्यासाठी एक वर्षाचा प्रमाणपत्र पाठ्यक्रम | प्रमाणपत्र | |
| **पाच-व्यावसायिक समुपदेष्टा** | | | |
| नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन अँण्ड ट्रेनिंग, श्री. अरोबिंदो मार्ग, नवी दिल्ली ११० ०१६. | शैक्षणिक आणि व्यावसायिक मार्गदर्शनामधील पदविका पाठ्यक्रम (९ महिन्यांचा कालावधी) | पदविका | |
| ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ फिजिकल मेडिसिन अँण्ड रिहॅबिलिटेशन, हाजी अली, खाड्ये मार्ग, महालक्ष्मी, मुंबई ४०० ०३४. | पी. जी. डी. आर. (व्यवसाय मार्गदर्शन) | पदविका | |
| **सहा-कम्युनिकेशन डिसऑर्डर्समधील पदविका** | | | |
| अली यावर जंग नॅशनल इन्स्टिटयूट फॉर दि हिअरींग हॅन्डीकॅप्ड, बांद्रे (प.), मुंबई ४०० ०५०. | कम्युनिकेशन डिसऑर्डर्स मधील पदविका (१ वर्ष) | पदविका | |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई